# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 25/11/2019 (सोमवार)
# (सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर राजधानी रेस्टॉरेन्ट समोर गौंडखैरी येथे दिनांक 21/11/2019 चे 01:30 वा. ते 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रोहीत नरेन्द्र दंडेवार, वय 29 वर्ष, रा. खलासी लाईन शिवमंदिर जवळ, मोहन नगर नागपूर यांनी त्यांची एमएच–31/सीझेड–4909 क्रमांकाची डिलक्स मोटरसायकल पंक्चर झाल्याने राजधानी रेस्टॉरेन्ट समोर पार्कींग मध्ये मोटरसायकल उभी ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किंमती 15,000/– रू. चा मुद्येमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ सपाटे हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. रामटेक :– दिनांक 24/11/2019 चे 01:00 वा. ते 06:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश उदाराम लोणारे, वय 40 वर्ष, रा. किमीया हॉस्पीटलच्या मागे शितलावाडी रामटेक हे त्यांच्या परीवारासह घरी झोपले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादी यांच्या उघडया दारातुन घरात प्रवेश करून लोखंडी कपाटातुन अज्ञात आरोपीने सोन्या–चांदीचे दागिने कि. 28,000/–रू. व रेडमी कंपनीचा मोबाईल फोन कि. 4,000/–रू. असा एकुण कि. 32,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अडामे हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– दिनांक 24/11/2019 चे 15:45 वा. ते 16:15 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर मधुकरजी लोनकर, वय 42 वर्ष, रा. टेंभुरडोह हे त्यांची एमएच–31/सीजे–0640 क्रमांकाची प्लेझर मोपेड ही मौजा टेंभुरडोह फाटा येथे ठेवुन शेतात गेले होते. दरम्यान आरोपी क्र. 1) शुभम नगीन उके, वय 24 वर्ष रा. पंचशिल नगर नागपुर व 2) अजर अकबर अली, वय 25 वर्ष, रा. महेन्द्र नगर, नागपुर यांनी फिर्यादींची मोपेड त्यांच्याकडे असलेल्या चाबीने सुरू करून सिरोंजीकडे घेऊन जात असतांना मौजा टेकाडी येथे फिर्यादी यांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक पंकज गाडगे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर